'ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार'
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

NAAC Accredited "A" with CGPA- 3.24 in 3rd cycle 58th Rank in India Ranking 2017 by NIRF (MHRD)

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर



# विवेक NEWS

● प्रबंध संपादक
प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर
● कार्यकारी संपादक
डॉ. दीपक तुपे
डॉ. प्रदीप पाटील
● सहाय्यक संपादक
अमेय संजय कवठेकर बी. ए. ३
मधुरा जयंत कुलकर्णी बी. ए. ३
मनाली महावीर पाटील बी. ए. ३
शुभम महादेव कुंभार बी. ए. ३
आदर्श हणमंत इंगवले बी. ए. २
चैतन्य प्रदीप कुलकर्णी बी. एस्सी. ३

वर्ष : ५ | अंक : १० | ऑगस्ट, २०१८ | पाने चार | पान नं. १ | स्वागत मूल्य : १ रुपया

## विवेकानंद शिक्षण संस्थेचे समाज उभारणीत भरीव योगदान

### शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव शुभारंभ प्रसंगी शिक्षण मंत्री ना. विनोद तावडे यांचे प्रतिपादन

कोल्हापूर, दि. ९/६/२०१८: "महाराष्ट्रातील शिक्षण विस्तारीकरणाच्या काळात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी याकरीता श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली व त्यामुळेच गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळाले, महाराष्ट्राच्या समाजउभारणीस एक वेगळे वळण मिळाले. विवेकानंद शिक्षण संस्थेचे हे कार्य अभिनंदनीय आहे. आजची शिक्षण पद्धती झपाट्याने बदलत असली तरी गुणवत्तेवर व कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम निर्मितीकडे लक्ष दिले पाहिजे", असे विचार महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री नामदार विनोद तावडे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालक मंत्री मा. चंद्रकांत (दादा) पाटील हे होते.

शिक्षणमंत्री नामदार तावडे यांनी आजचे बदलते जागतिकीकरण व शिक्षण व्यवस्था यावर मार्मिक विवेचन केले. ते आपल्या भाषणात म्हणाले, "आज श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने अनेक शाळा, कॉलेजच्या माध्यमातून समाजात शैक्षणिक क्रांती घडवली आहे. डॉ. बापूजी साळुंखेंच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने ही शिक्षणसंस्था नवे कोर्सेस व नवी शैक्षणिक धोरणे राबवून शिक्षणात नवे बदल घडवत आहे."

मा. नाम. चंद्रकांत (दादा) पाटील यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वाटचालीचा व विविध उपक्रमांचा आढावा घेत ही संस्था समाजाभिमुख करत असलेल्या कार्याचा गौरव केला.

आपल्या मनोगतात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु मा. देवानंद शिंदे म्हणाले, बापूजींनी दुर्गम भागात केलेल्या शिक्षणाच्या सोयीमुळे माझ्यासारख्या विद्यार्थ्याला शिक्षणक्षेत्रातील सर्वोच्च पदापर्यंत जाता आले. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले, डॉ. बापूजींनी माणसामधील परमेश्वर जागा केला. त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे समाजाला नवी दिशा प्राप्त झाली आहे. कोल्हापूरच्या महापौर सौ. शोभाताई बोंद्रे यांनी बापूजींच्या व संस्थेच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. मा. आय. डी. पाटील, प्रवर अधीक्षक, डाकघर, कोल्हापूर यांनी बापूजींच्याबद्दल आपले विचार मांडले.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी श्री. महेश हिरेमठ यांनी संस्थेची प्रार्थना व भक्तिगीते सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. प्राचार्य डॉ. आर. व्ही शेजवळ यांनी जन्मशताब्दी महोत्सवाची भूमिका व नियोजनासंबंधी विचार मांडले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पोस्ट तिकिटाचे व पोस्ट पाकिटाचे अनावरण करण्यात आले. तसेच जन्मशताब्दी वर्ष लोगोचे उद्घाटन करण्यात आले. जन्मशताब्दी नियोजन पुस्तिका व दिनदर्शिकेचे



प्रकाशनही यावेळी करण्यात आले. शेवटी आभार मानताना संस्था सचिव मा. प्राचार्य सौ. शुभांगी गावडे म्हणाल्या, डॉ. बापूजींनी उभी केलेली ज्ञानभूमी जनसेवेची कर्मभूमी आहे. शिक्षणाच्या प्रसारातून उच्चतम संस्कारमूल्ये जतन करावयाची आहेत.

सकाळ सत्रात जन्मशताब्दी शुभारंभ ऐतिहासिक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये सर्व गुरुदेव कार्यकर्ते व विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी संस्था उपाध्यक्ष मा. संपतराव जेधे, प्राचार्य युवराज भोसले, प्राचार्य धनराज भोसले, प्राचार्य आर. आर. पाटील, मा. जी. पी. काका पाटील, शाहीर कुंतीनाथ करके, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, सर्व आजीव सेवक, आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

- मधुरा कुलकर्णी

## स्वायत्ततेची मोहर

कोल्हापूर, दि. २१/०३/१८ : विद्यापीठ अनुदान आयोग, (UGC) नवी दिल्ली ने 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे 'विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरला' स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान केला आहे. या विषयी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हटले की, 'महाविद्यालय एका नव्या टप्प्यावर आपल्या प्रगतीचे पाऊल मोठ्या आत्मविश्वासाने टाकत असून यूजीसीचा निर्णय सार्थ ठरवेल'. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त केले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी विवेकानंद कॉलेज सन २०१८-१९ पासून स्वायत्तत होत असल्यामुळे समाधान व्यक्त केले .

- मधुरा कुलकर्णी

## देशप्रेमी शहिदांच्या कार्यांचे स्मरण करावे : अभयकुमार साळुंखे

कोल्हापूर, दि. १५/०८/२०१८ : दीडशे वर्षे राज्य करणाऱ्या इंग्रजांना या देशातील क्रांतिकारकांनी व शुरवीरांनी लढा देऊन स्वातंत्र्य प्राप्त केले. ज्यांनी या देशासाठी बलिदान दिले त्यांना अभिवादन करण्याच्या उद्देशाने हा ७२वा स्वातंत्र्य दिन आपण साजरा करीत आहोत. आपल्या देशात अनेक धर्म, जाती, पंथ आहेत. अनेकतेतून एकता आणि राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी सर्व देशबांधवानी एकत्र येऊन समाजाचा व देशाचा विकास साधला पाहिजे, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या स्वातंत्र्यदिनाच्या ध्वाजारोहण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. वाय.



होनगेकर हे उपस्थित होते. यावेळी एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांनी संचालन केले. यावेळी मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते महाविद्यालयातील सेट परीक्षा उत्तीर्ण, पुस्तक लेखक व सेवानिवृत्त प्राध्यापकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन जिमखाना प्रमुख प्रा. किरण पाटील, एन. सी. सी. प्रमुख प्रा. एस. जी. गावडे, प्रा. सौ एस. एम. भोसले, प्रा. श्रीमती एस. आर. कच्छी, प्रा. एस. एस. कुंडले, रजिस्ट्रार सी. बी. दौडमणी, रवी चौगुले यांनी केले. या ध्वाजारोहण समारंभासाठी प्राचार्य आर. जी. पाटील, प्राचार्य धनराज भोसले, उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. किरण पाटील व प्रा. कु. समिक्षा फराकटे यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य एस. वाय होनगेकर यांनी केले तर आभार प्रा. एस. आर. पानस्कर यांनी मानले.

## चव्हाण यांना राज्यस्तरीय पुरस्कार

कोल्हापूर, दि. ०८/०५/२०१८ : विवेकानंद कॉलेजमधील प्राजक्ता चव्हाण हिला सत्यमेव जयते शिक्षण बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय सामाजिक कार्यप्रेरणा गौरव पुरस्कार जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते देण्यात आला. राळेगणसिद्धी येथे आयोजित महाराष्ट्र राज्य युवा परिषदेत राज्यभरातून ३३ जिल्ह्यातील युवकांचा सहभाग होता. तिथे श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्य सौ. शुभांगी गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी अभिनंदन केले.

## जीवन जगण्यासाठीच साहित्य

### वाङ्मय मंडळ उद्घाटन समारंभात राजन गवस यांचे मत



कोल्हापुर, ३०/०७/२०१८: आजचे जग माहिती न देणारे माहिती तंत्रज्ञानाचे जग आहे. त्यामुळे सामान्य माणसाचं जगणं बदलत चालले आहे. माणसांच्या भावनांचा कडेलोट झाला आहे, जगण्याच्या कल्पना कृत्रिम झाल्या आहेत. माणसाचा माणसाशी संबंध राहिला नाही. ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार समाजातून हद्दपार होत आहे. अशा परिस्थितीत आपलं जगणे सुंदर करण्यासाठी साहित्य वाचलं पाहिजे. तरच माणसाला जगणं कळेल. असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिक व शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजन गवस यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या वतीने आयोजीत वाङ्मय मंडळ उद्घाटन समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर हे होते.

आपल्या भाषणात डॉ. गवस पुढे म्हणाले की, माहिती तंत्रज्ञान म्हणजे विश्व नव्हे तर साहित्य आपल्या सगळ्या जगण्याशी संबंधीत असतं, आपल्याला माणूस वाचता आला पाहिजे आणि जर माणूस वाचता यायचा असेल तर पुस्तके वाचली पाहिजेत. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, जगणं समजून घ्यायच असेल तर साहित्य वाचले पाहिजे. साहित्य माणसाच जगणं बदलून टाकते. जीवनाचे खरे यश साहित्यात दडलेले आहे. साहित्यातून जीवन समजून घ्या म्हणजे जीवनाचा खरा अर्थ कळेल, पुस्तक वाचलं तर मस्तक स्वस्थ होईल आणि स्वस्थ मस्तक असणारा माणूसच कुणापुढे नतमस्तक होत नाही.

कार्यक्रमाची सुरूवात रोपट्याला पाणी घालून करण्यात आली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक वाङ्मय मंडळाचे प्रमुख प्रा. डॉ. दीपक तुपे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. बी. के. गोसावी यांनी करून दिला तर आभार प्रा. डॉ. सौ. पी. ए. पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. कु. समीक्षा फराकटे व डॉ. प्रदीप पाटील यांनी केले. या कार्यक्रमास प्रा. एस. एम. रूईकर, प्रा. एच. व्ही. चामे, प्रा. पी. पी. गवळी, प्रा. डॉ. सौ. श्रुती जोशी, डॉ. राज चव्हाण, डॉ. कैलास पाटील व प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनीं बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## फोटोग्राफी, ॲनिमेशन, फिल्ममेंकिंग कोर्स सुरू

कोल्हापूर, दि. २६/०७/२०१८: विवेकानंद कॉलेजमध्ये सन२०१८-१९ पासून यूजीसी मान्यताप्राप्त ॲनिमेशन व फिल्ममेकिंग तीन वर्षाचा बी. व्होक पदवी अभ्यासक्रम, ॲडव्हान्स डिप्लोमा इन फोटोग्राफी कोर्स सुरू करण्यात आले आहेत. यूजीसीकडून स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळालेल्या कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज येथे यूजीसीच्या अनुदानामधून शिवाजी विद्यापीठ व शासन मान्यता प्राप्त, कौशल्यावर आधारित बी. व्होक ग्राफिक डिझाइन व फौंड्री टेक्नॉलॉजी विभागाचे पदवी व पदविका कोर्सेस गेली ५ वर्षे सुरू आहेत. तसेच कम्युनिटी कॉलेज अंतर्गत 'डिप्लोमा इन फौंड्री' हा कोर्स उद्योग क्षेत्रामधील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरू आहे. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी सांगितले की, ॲनिमेशन व फिल्म मेकिंग या क्षेत्रामध्ये पदवी घेण्यासाठी खासगी संस्थामध्ये लाखामध्ये फी मोजावी लागते व त्यामुळे अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे करिअर करण्याची इच्छा असूनही वंचित राहिलेले आहेत, अशांसाठी ही एक फार मोठी संधी आहे.

## निवडीचे स्वातंत्र्य म्हणजे सीबीसीएस

कोल्हापूर, दि. २५/६/२०१८ जग बदलत आहे. नव उत्पादन आणि संशोधनाने विचारांची नवी दालने समृद्ध होत आहेत. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी विद्यार्थी केंद्रीत नवमुल्यांकन शिक्षणपद्धतीचा अवलंब केला पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी. टी. शिर्के यांनी विवेकानंद कॉलेज येथे आयोजित Choice Based Credit System (CBCS) या एकदिवसीय कार्यशाळेत केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर हे होते.

डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार विषय निवडीचे स्वातंत्र्य हवे. बदलत्या शिक्षण पद्धतीची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, विद्यार्थ्यांची गुणवत्ता व उपस्थिती यासाठी CBCS शिक्षणपद्धती अस्तित्वात आलेली असून यासंबंधी भारत सरकार, विद्यापीठ अनुदान आयोग आणि विद्यापीठीय कार्यक्षेत्रावर चर्चाविनिमय सुरु आहे. यावेळी पदार्थविज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. एम. एम. कारंजकर, डॉ. ए. एम. गुरव यांनी शिक्षण पद्धतीबरोबर अभ्यासक्रम आणि गुणांकन पद्धती बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय होनगेकर यांनी CBCS मुल्यांकन पद्धतीच्या अनेक समस्यांचा उहापोह करुन ही पद्धती कशी राबवता येईल याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, संस्थामाता श्रीमती सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमा पूजनाने व संस्था प्रार्थनेने करण्यात आली. IQAC च्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रथम सत्राचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उदयसिंह माने पाटील यांनी जगातील सर्व विद्यापीठांना समांतर जाईल अशी नवीन शिक्षण पद्धती येऊ घालत आहे, असे सूतोवाच केले. दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष डॉ. सतिश घाटगे यानीही नव्या शिक्षण पद्धतीबद्दल मौलिक मार्गदर्शन केले. प्रथम सत्र व द्वितीय सत्राचे आभार प्रा. सनी काळे व डॉ. शुभांगी काळे यांनी मानले. डॉ प्रभा पाटील यांनी या संपूर्ण कार्यशाळेचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन. प्रा. समिक्षा फराकटे यांनी केले.

- अमेय कवठेकर

